पारोळा पोलीस स्टेशन
दि.२८/०४/२०२५

प्रति,

संपादक,

-----------------------------------

आपणास याद्वारे कळविण्यात येते की, पारोळा पोलीस स्टेशन अ.मृ.रजि.नं.४०/२०२५ भा.ना.सु.सं कलम १९४ अन्वये दिनांक १९/०४/२०२५ रोजी दाखल होऊन सदर प्रकरणाची पुढील चौकशी पोलीस उपनिरीक्षक अमरसिंग वसावे यांचे कडेस देण्यात होती. पोलीस निरीक्षक सुनिल पवार, पोलीस उपनिरीक्षक अमरसिंग वसावे,पोलीस अंमलदार पोहेकॉ ४२८ सुनिल हाटकर ,पोकॉ किशोर भोई असे घटनाठिकाणी जाऊन घटनास्थळ पाहणी केली असता त्यात घटनाठिकाण व घटनेचे स्वरुप हे संशयास्पद दिसुन आल्याने त्या बाबत मा.माहेश्वर रेड्डी सर,पोलीस अधिक्षक मा. कविता नेरकर मॅडम अपर पोलीस अधिक्षक,मा.विनायक कोते उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग अमळनेर अशांना सदर बाबत माहीती कळविली होती. त्यांनी घटनेचे गांभीर्य बघता चौकशीचे सविस्तर सुचना दिल्या व तपास बाबत मार्गदर्शन केले त्यानुसार पारोळा पोस्टे कडील सदर प्रकरणाचे चौकशी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक श्री अमरसिंग वसावे व त्याचे सोबत तपास पथकातील पोहेका ४२८ सुनिल हाटकर,चालक पोहेकॉ २३०३/ संजय पाटील ,पोकॉ २२५८ /अनिल राठोड ,पोकॉ/ १६१२अभिजित पाटील यांनी संशयित ,मयत व ईतर संबंधीत ईसम यांचे कडील प्राप्त पुराव्याचे तांत्रिक विश्लेषण करता त्यात खबर देणार संशयित आरोपी संदिप पाटील याने दिलेली खबर व प्रत्यक्षदर्शी पुरावे यात तफावत असल्याचे दिसुन आले म्हणुन आमचे तपास पथक मधील अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी त्यानुसार घटनाघडल्यापासुन पारोळा शहरात,अमळनेर शहरात ,धुळे अशा वेगवेगळ्या ठिकाणी तपास पथक रवाना करुन सीसीटीव्ही फुटेज पाहुन व गोपनिय बातमीदार यांना सदर घटनेची सविस्तर माहीती देऊन त्यांचे कडुन मिळालेल्या माहीती यातुन असे निष्पन्न झाले की, यातील आरोपी संदिप भालचंद्र पाटील याने त्याचा शालक मयत समाधान शिवाजी पाटील याचे नावावर वेगवेगळ्या विमा कंपनीचा पॉलीसस काढुन ठेवलेल्या होत्या ,त्यांना मयताचे आई व आरोपी ची पत्नी यांना वारस केल्याचे दिसुन आले. तसेच सदर अपघातात दाखविलेले दुचाकी स्कुटी क्रमांक एमएच ५४-ए-९५१३ ही पुर्णपणे इंन्शुरड होती. त्यातुन आरोपी संदीप पाटील रा. शेवगे बु. ता. पारोळा व त्याचा साथीदार चंद्रदीप आधार पाटील रा. खवशी ता. अमळनेर यांनी कट रचुन मयत समाधान पाटील याचा नावावरील पॉलीसची विमा रक्कम व दुचाकीची विमा रक्कम पुर्णपणे आपणास मिळावी.या हव्यासातुन एका निष्पाप मुलाचा खुन करुन अपघाताचा बनाव केला.असे निष्पन झाल्याने पारोळा पोलीस स्टेशन येथे पोलीस उपनिरीक्षक अमरसिंग वसावे नेम.पारोळा पोलीस स्टेशन यांनी चौकशीअंती आरोपी संदिप भालचंद्र पाटील वय ४० वर्ष रा. शेवगे बु. ता. पारोळा जि.जळगाव व चंद्रदीप आधार पाटील वय ४५ वर्ष रा. खवशी ता. अमळनेर यांचे विरुध्द फिर्याद दिल्याने पारोळा पोलीस स्टेशन येथे सीसीटीएनएस गु.र.नं.९१/२०२५ भा.न्या.सं.कलम १०३,६१(२) अन्वये दिनांक १८/०४/२०२५ रोजी गुन्हा दाखल करुन नमुद दोन्ही आरोपी यांना ताब्यात घेऊन त्यांची कसुन चौकशी करता घटनेचे दिवशी मयत समाधान शिवाजी पाटील रा. फागणे ता. जि.धुळे यास लाल व ग्रे रंगाची स्कुटी गाडी क्र.एमएच ५४-ए-९५१३ वर बसवुन घेऊन जाऊन धुळे ते जळगाव अशा जाणा-या रोडाचे बाजुला घेऊन जाऊन अंधा-यात डोक्यावर लोखंडी रॉड ने मारहाण करुन त्याला जिवेठार मारले व अपघातचा बनाव केला.अशी कबुली दिली आहे.

तरी सदर गुन्ह्याचे तपासात मा.माहेश्वर रेड्डी सर,पोलीस अधिक्षक मा. कविता नेरकर मॅडम अपर पोलीस अधिक्षक,मा.विनायक कोते उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग अमळनेर यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळाल्याने त्यानुसार अतिशय क्लिष्ट घटनेचा उलगडा करता आला.सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन मा.उपविभागीय पोलीस अधिकारी मा.विनायक कोते हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

सविनय सादर

सुनिल एच पवार
पोलीस निरिक्षक
पारोळा पोलीस स्टेश



महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
पारोळा पोलीस स्टेशन